मंत्रालयीन विभागातील लिपिक/लिपिक-टंकलेखकाचे सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा २०१६ साठी अर्ज मागविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः सेप्रप१९१६/प्र.क्र.१/का.१७
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: ४ जानेवारी, २०१६.

<u>पहा-</u>

१. महाराष्ट्र शासन दुय्यम मंत्रालय सेवा (निम्नस्तर लिपिक) सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा नियम, दिनांक ६ जून, १९७७.
२. महाराष्ट्र शासन दुय्यम मंत्रालय सेवा (निम्नस्तर लिपिक) सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा (सुधारणा) नियम, दिनांक ५ मे, २०११.
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-१०८९/सीआर-२४/८९/१२, दिनांक २६ नोव्हेंबर, १९९०.

शासन परिपत्रक-

मंत्रालयीन विभागातील लिपिक व लिपिक-टंकलेखक यांचे सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा २०१६ साठीचे प्रशिक्षण वर्ग लवकरच आयोजित केले जाणार आहेत.

२. सदर प्रशिक्षण वर्ग प्रवेशास आणि परिक्षेस पात्र असलेले उमेदवार पुढीलप्रमाणे आहेत.:-
(१) लिपिक-टंकलेखक या पदावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे पुरस्कृत उमेदवार, (२) दिनांक २६ नोव्हेंबर, १९९० च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार लिपिक-टंकलेखक या संयुक्त संवर्गात समाविष्ट झालेले कर्मचारी, (३) सेवायोजन कार्यालय किंवा इतर माध्यमामार्फत लिपिक व लिपिक-टंकलेखक पदावर नियुक्त होऊन सामान्य प्रशासन विभागाकडून सेवा नियमित केलेले कर्मचारी, (४)”ड”वर्गातून लिपिक व लिपिक-टंकलेखक पदावर नियमित पदोन्नती दिलेले कर्मचारी.

३ जे लिपिक/लिपिक-टंकलेखक यापूर्वीच्या परीक्षेस बसून अनुत्तीर्ण झाले आहेत अथवा परीक्षेसाठी अर्ज भरून अनुपस्थित राहीले आहेत त्यांचे परीक्षेस बसण्यासंबंधीचे अर्ज आता पाठवू नयेत. त्यांचे अर्ज नंतर स्वतंत्रपणे मागविण्यात येतील त्यावेळी ते पाठविण्यात यावेत.

४ सदर परिपत्रक सर्व संबंधित लिपिक/लिपिक-टंकलेखकांच्या (प्रतिनियुक्तीवर/रजेवर असलेल्या लिपिक/लिपिक-टंकलेखकांसह) कृपया त्वरित लेखी स्वरुपात निदर्शनास आणावे व त्यांची स्वाक्षरी घेऊन आपल्या अभिलेखात जतन करुन ठेवावी. त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी आपल्या विभागाच्या आस्थापना शाखेची राहील याची कृपया नोंद घेण्यात यावी.

५. सदर प्रशिक्षण आणि परीक्षेसाठी सादर करावयाचा विहित नमुन्यातील अर्ज महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर “आवेदनपत्र” या मथळ्याखाली उपलब्ध आहे. मंत्रालयीन विभागातील ज्या लिपिक/लिपिक-टंकलेखकांचे प्रशिक्षण अद्याप झालेले नाही आणि जे सदर परीक्षेस बसण्यास पात्र आहेत अशा लिपिक/लिपिक-टंकलेखकांचे विहित नमुन्यातील अर्ज आस्थापना अधिकाऱ्यांनी प्रमाणित

करुन, या विभागाकडे दिनांक ४ फेब्रुवारी, २०१६ पर्यंत पाठविण्यात यावेत. सदर अर्जामध्ये उमेदवाराचा नियमित नियुक्ती दिनांक बरोबर असल्याची आस्थापना अधिकाऱ्यांनी खात्री करावी, ही विनंती.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१६०१०४१६५६०४१२०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashok D Bhawar

Digitally signed by Ashok D Bhawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=DESK OFFICER, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=889194f9dc0d33cf371e0c5894ba7eb11af93d7eb91047cde855f6cea48479ec, serialNumber=a5b971e0d66fa6d25553669ec4c46d80f1a7679479035f99c2d14d7244aad1f6, cn=Ashok D Bhawar
Date: 2016.01.04 16:57:19 +05'30'

(अ.धों.भवार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना)
२. सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन १४-अ
३. निवडनस्ती.